# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416004 महाराष्ट्र

Estd. 1962 | PHONE: EPABX – 0091-0231-2609000 | CoE Office: 0231-2609067
NAAC 'A' Grade | B.A. Exam. Section: 0231-2609116 | FAX: 0091-0231-2690655
MHRD NIRF-28th Rank | Website: www.unishivaji.ac.in | E-mail: ba.section@unishivaj.ac.in


---

संदर्भ क्र: शिवाजी वि/बी.ए./परीक्षा/३२६५ दिनांक.:- २५/०८/२०१६

मा.प्राचार्य,
सर्व संलग्नीत कला,वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालये

विषय :- ऑक्टोबर/नोव्हेंबर २०१६ चे परीक्षा अर्ज भरण्याबाबत.

महोदय/महोदया,

परीक्षक नियुक्ती विभागाचे परिपत्रक शिवाजी वि/परीक्षक नियुक्ती/३१६२, दि. २३ ऑगस्ट, २०१६ नुसार ऑक्टो/नोव्हें. २०१६ चे परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा व परीक्षा सुरुवातीच्या तारखा जाहिर केलेल्या आहेत. अधिकार मंडळाच्या ठरावानुसार एमकेसिएल पोर्टल बंद करुन सर्व परीक्षा अर्ज Unishivaji च्या Online.shivajiuniversity.in या प्रणालीतून परीक्षा अर्ज भरले जातील अशा सूचना दिनांक-१४/१५ जुलै २०१६ आयोजित केलेल्या कार्यशाळेत देण्यात आलेल्या होत्या, तथापी

१) विद्यापीठ प्रशासनाने निश्चित केलेल्या धोरणानुसार शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये डियुडीसी पोर्टल (एमकेसीएल) मधील २२ अभ्यासक्रमाच्या सत्र ५ नियमित व सत्र १ ते ६ पुर्नपरिक्षार्थी यांचे परीक्षा अर्ज पूर्वी प्रमाणेच (suk.digitaluniversity.ac) कॉलेज लॉगीन मधूनच भरावयाचे आहेत.

२) जे विद्यार्थी २०१५-१६ ला ऑक्टोबर २०१५ ला सत्र १ ला फ्रेश होते व मार्च २०१६ ला सत्र २ ला फ्रेश होते त्यापैकी जे उत्तीर्ण किंवा ATKT मिळून सत्र ३ ला आले असे सर्व (सत्र १ व २ रिपीटर व सत्र ३ फ्रेश) चे परीक्षा अर्ज (२०१५ ने सुरु होणारे पीआएन) Online.shivajiuniversity.in या प्रणालीतून भरावेत.

उपरोक्त १ व २ मधील परीक्षा अर्जांच्या यादया जमा करताना ऑनलाईन (विद्यापीठ प्रणाली) व एमकेसिएल (डियुडीसी प्रणाली) स्वतंत्र जमा कराव्यात. सदर यादया एकत्रित जमा करु नयेत.

३) अ) प्रथम वर्षानंतर गॅप घेवून द्वितीय वर्षास किंवा द्वितीय वर्षानंतर तिस-या वर्षास प्रवेश घेणारे.
ब) वार्षिक पध्दतीमधून सत्र पध्दतीमध्ये प्रवेश घेणा-या
क) Double Graduation साठी परीक्षा अर्ज भरणा-या
ड) बाहेरील विद्यापीठात F.Y. किंवा S.Y. ची परीक्षा देवून पुढील परीक्षा शिवाजी विद्यापीठात देणा-या

विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज (RBA 11(i), RBA 12,13 , RBA 17) ऑनलाईन पध्दतीने भरता येणार नाहीत त्यामुळे क्रमांक ३ मधील सर्व परीक्षा अर्ज मॅन्युअली पध्दतीने भरावयाचे आहेत याची नोंद घ्यावी.

उपरोक्त क्रमांक १ व २ मधील परीक्षा अर्जांच्या फक्त Inward यादया स्वतंत्र पध्दतीने जमा करावयाच्या आहेत व क्रमांक ३ मधील अ ते ड मधील परीक्षा अर्ज ते वर्णानुक्रमे लावून त्याच्यावर दोन प्रतीमध्ये यादी करुन सोबत जमा करावेत.

ऑक्टोबर २०१५ व मार्च २०१६ ला असे निदर्शनास आले आहे कि बरेच महाविद्यालयाचे बी.ए., बी.कॉम चे परीक्षा अर्जांचे चलन एकत्र करतात तसे न करता वरील क्र १ ते ३ ची स्वतंत्र चलन करावे व बी.ए., बी. कॉम, बी.एस्सी किंवा अन्य परीक्षा (परिपत्रकातील सूचना क्र. ७) अशी स्वतंत्र चलन करुन परीक्षा यादया व परीक्षा शुल्क जमा करावेत, त्याच बरोबर दंडक ८०अ नुसार ज्या विद्यार्थ्यांना भाग १,२ किंवा ३, ६ वर्षाच्या कालावधीमध्ये उत्तीर्ण झालेला नाही किंवा प्रथम वर्षास प्रवेश घेतल्यापासून १८ वर्षामध्ये डिग्री पूर्ण केलेली नाही अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरुन घेतांना दक्षता घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

सही/-
उपकुलसचिव